दि.०६/०२/२०२३

**प्रसिध्दी पत्रक**

आरोपी लोकसेवक - श्री.साळोबा लक्ष्मण वेताळ, वय 51 वर्षे, पद- उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय गंगापुर जिल्हा-औरंगाबाद (वर्ग-2) यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख 30000/- रुपये स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे गंगापुर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री.साळोबा लक्ष्मण वेताळ, वय 51 वर्षे, पद- उप अधीक्षक, भुमी अभिलेख, कार्यालय गंगापुर जिल्हा-औरंगाबाद (वर्ग-2) |
| लाच मागणी रक्कम | :- | 40000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 30000/- रुपये. |
| तपास अधिकारी | :- | श्री. गोरखनाथ गागुंर्डे, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या शेतीच्या मोजणीसाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे शेतीची मोजणी करुन देण्याकरिता आ.लो.से. श्री. वेताळ हे 40000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. वेताळ यांनी 40000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 35000/- रुपये पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि.06/02/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. वेताळ यांनी लाचेची रक्कम 30000/-रुपये पंच साक्षीदारा समक्ष भुमी अभिलेख कार्यालयात गंगापुर येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से. वेताळ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे गंगापुर औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक गोरखनाथ गागुंर्डे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो. अं. दिगंबर पाठक, सुनिल पाटील चालक- चंद्रकांत शिंदे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस अधीक्षक :- 9923023361
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

पोलीस उप अधिक्षक कार्यालय * ॲन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद * सत्यमेव जयते

6/2/23

(मारुती [illegible] पंडित)
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद.